॥ श्री ॥

# प्रस्तावना

**१) पंचदशीच्या लेखकांचा परिचय -**

पूर्वीचे ग्रंथकर्ते स्वतःविषयी फार कमी लिहीत असत व त्यांच्याविषयी लेखनही कमीच असे. जे होते, तेही काळाच्या ओघात किती नष्ट झाले असेल ते सांगता येत नाही. त्यामुळे त्यांच्या जीवनाच्या संदर्भातील सनावळ्या अंदाजाने जुळवून काही कालनिर्णय करावे लागतात. ग्रंथाच्या वाचकाला लेखकाविषयी आदरयुक्त कुतूहल असणे स्वाभाविक व स्वागतार्ह असले तरी ते कुतूहल शमण्याची साधने फारच तुटपुंजी आहेत. तथापि उपलब्ध माहिती संक्षेपाने देण्याचा प्रयत्न केला आहे.

यवनांची दक्षिणेकडील सैनिकी आक्रमणे व जुलमी धर्मपरिवर्तने ऐन भरात असतांना, संन्यस्त वृत्तीने राहिलेल्या माधवाचार्यांनी (भावी विद्यारण्य) स्वतःचे श्रीभुवनेश्वरीच्या मंदिरात चाललेले तप थांबवून प्रत्यक्ष राजकारणात प्रवेश केला. विजयनगरच्या पराभूत साम्राज्यातील हरिहर नावाच्या पराक्रमी पुरुषाला गादीवर बसवून पुन्हा राज्याची घडी नीट बसवून दिली. पुढे ते इ. स. १३८० मध्ये शृंगेरी मठाचे पीठस्थ शंकराचार्य झाले व त्यांनी 'विद्यारण्यतीर्थ' हे नाव घेतले. त्यावेळी त्यांचे वय ८५ वर्षांचे होते. त्या वयात त्यांनी पंचदशी हा महान ग्रंथ लिहावयास घेतला पण सहा प्रकरणे लिहून झाल्यावर त्यांनी देह ठेवला. पुढील ९ प्रकरणे त्यांचे श्रीगुरू श्रीभारतीतीर्थ ह्यांनी लिहून ग्रंथ पूर्ण केला अशी आख्यायिका आहे. विद्यारण्यस्वामींच्या नावाने सुमारे सोळा ग्रंथ प्रसिद्ध आहेत. त्यातील वैयासिक न्यायमाला, विवरणप्रमेय, जीवन्मुक्तीविवेक इत्यादी ग्रंथ अधिक प्रसिद्ध आहेत.

इ. स. १२९५ मध्ये जन्म व १३८६ मध्ये समाधी असा निष्कर्ष श्रीविद्यारण्यस्वामींच्या संदर्भात पं. द. वा. जोग ह्यांनी काढला आहे.

पंचदशी ग्रंथामध्ये अन्य वेदान्तपर ग्रंथांचा उल्लेख आहे व त्या ग्रंथांतून काही भाग अत्यल्प प्रमाणात पंचदशी ग्रंथामध्ये स्वीकारलाही आहे.

**२) पंचदशी ग्रंथात स्वीकारलेले प्रमुख ग्रंथ व त्यांचा किंचित् परिचय पुढीलप्रमाणे आहे -**

१ - संक्षेपशारीरक - सर्वज्ञात्ममुनी हे ह्या ग्रंथाचे लेखक असून या ग्रंथावर तत्त्वबोधिनी, सुबोधिनी इत्यादी टीका आहेत. त्यातील एक टीकाकार मधुसूदनसरस्वती हे अद्वैतसिद्धीचे लेखक म्हणूनही प्रसिद्ध आहेत. संक्षेपशारीरकाचे चार अध्याय असून ह्या ग्रंथाचे दहा विशेष प्रस्तावनेत सांगितले आहेत. अहमदाबाद येथील स्वामी सर्वानंदजी महाराज ह्यांनी ह्या ग्रंथाचे संपादन करून त्यावर हिन्दी भाषेत टीका लिहिली आहे.

२ - खंडन खण्ड खाद्य - श्रीहर्ष ह्यांनी ह्या ग्रंथाची रचना केली असून त्यावर स्वामी हनुमानदासजी षट्शास्त्री ह्यांची हिन्दी टीका उपलब्ध आहे. ह्या ग्रंथात जाणीवपूर्वक आडवळणी मांडणी करून वितंडा

ह्या वादपद्धतीचा स्वीकार केला आहे. ह्यामध्ये स्वतःचे मत बिलकूल न मांडता इतर सर्व मतांचे न्यायशास्त्राच्या आधाराने खण्डन केले असून प्रमुख प्रतिवादी नैय्यायिक आहेत. या ग्रंथात नैय्यायिकांनी मांडलेल्या प्रस्थापित संकल्पनांना हादरे देऊन त्यांच्या मांडणीमध्ये आक्षेपांचे दुर्लंघ्य अडथळे उभे केले आहेत.

३ - विवरणप्रमेयसंग्रह - हा ग्रंथ श्रीविद्यारण्य स्वामींचाच असून ते पंचपादिका ह्या ग्रंथाचे व्याख्यान आहे. प्रस्थानत्रयीतील ब्रह्मसूत्राच्या पहिल्या चार सूत्रांवरील ही टीका आहे. सूत्र व त्यावरील वर्णके असे ह्या ग्रंथाच्या रचनेचे स्वरूप आहे. सुमारे नऊशे पृष्ठांच्या ह्या ग्रंथाचे हिन्दी भाषान्तर पं. ललिताप्रसाद डबराल ह्यांनी केले आहे.

४ - योगवासिष्ठ - हा ग्रंथ श्रीवसिष्ठांनी श्रीरामांना उपदेशिला आहे. अनेक आख्यानांच्या आधारे यात तत्त्वज्ञान स्पष्ट केले असून व्यवहार सांभाळून जीवन्मुक्ताचे जीवन कसे जगता येते हे सांगितले आहे.

**३) पंचदशीचे काही टीकाकार -**

श्रीरामकृष्ण यति व अच्युतराय मोडक ह्यांच्या संस्कृत टीका असून श्री. बापटशास्त्री व पं. द. वा. जोग ह्यांच्या मराठी टीका आहेत. श्री. पीतांबरजी ह्यांची हिन्दी टीका आहे. पुढील सर्वच टीकाकार मागील टीकाकारांच्या खांद्यावर उभे राहून वाटचाल करतात. दोन्ही मराठी टीका पन्नास वर्षांपूर्वीच्या असून त्यात वाचकाला त्याकाळची भाषा व त्यातील संदिग्धता ह्यामुळे काही अडचणी जाणवतात. विद्वत्ताप्रचुर भाषा नव्या वाचकांना समजणे कठीण वाटते. मोठ्या पंडितांना त्यांच्या मताने सोप्या असलेल्या बाबींचे स्पष्टीकरण अनावश्यक वाटते. त्यामुळे नवख्या वाचकाच्या दृष्टीने संदिग्धता राहून जाते. ह्या टीकेत या दोन्ही बाबी विचारात घेऊन रचना केली आहे. यशापयश वाचक जाणे!

**४) पंचदशीच्या श्लोकांची रचना -**

पंचदशीचे बरेचसे श्लोक उपनिषदांच्या मंत्रांवर आधारलेले आहेत. मंत्रांचा काही भाग घेऊन त्याच्या आधारे श्लोकरचना केली आहे. काही श्लोक उपनिषदातून जसेच्या तसे स्वीकारले असून श्रीमत् भगवद्गीतेचे व योगवासिष्ठाचेही काही श्लोक जसेच्या तसेच घेतले आहेत. बहुतेक सर्व तत्त्वज्ञान शांकर अद्वैत वेदान्तानुसारी आहे. उपनिषदे व गीताश्लोकांचा तपशील जेथल्या तेथे देण्याचा प्रयत्न केला आहे.

**५) प्रस्तुत टीकेचे स्वरूप -**

प्रत्येक मूळ श्लोक, त्याचा अन्वय व अर्थ वाचून टीका वाचणाऱ्यांची संख्या बरीच कमी आहे असे गृहीत धरले आहे. त्यामुळे श्लोकाचा अर्थ त्याच्या अन्वयाला घट्ट धरून न करता सहज समजेल असा केला आहे. अन्वयानुसारी अर्थ करताना बऱ्याच वेळा तो क्लिष्ट व आडवळणी होतो. श्लोकरचनेचे स्वरूपच संदिग्ध असल्याने अडचणीत भर पडते. प्रस्तुत टीकेचा मूळ उद्देशच जास्तीत जास्त नव्या

वाचकांना ग्रंथ समजावा हा आहे. हल्ली असे मूलग्रंथ वाचण्याची प्रवृत्ती कमी होत असतांना असे सुलभीकरण आवश्यक आहे असे वाटते. अर्थात ह्या प्रकारचे ग्रंथ किती सोपे होणे शक्य आहे ह्यालाही मर्यादा आहेच. तरी नैय्यायिकांची प्रखर भाषा टाळण्याचा प्रयत्न केला आहे.

### ६) श्रीपंचदशी ग्रंथाचे महत्त्व -

परमार्थशास्त्र किंवा अध्यात्मशास्त्र हे एक परिपूर्ण शास्त्र आहे. त्याविषयी बरेच समज-गैरसमज श्रद्धावन्त व नास्तिकातही असतात. डोळसपणे साधना करावयाची असेल तर ह्या शास्त्राची स्पष्ट कल्पना असणे चांगले. साधन करतांना व ते पूर्ण झाल्यावर काय होते व काय होत नाही ह्याची कल्पना नसेल तर जे होतच नाही त्याची वाट पाहण्यात वेळ व उत्साह संपतो. जे झाले पाहिजे ते ठाऊक नसेल तर साधना योग्य मार्गाने व वेगाने होत नाही. ह्या ग्रंथात ह्या दोन्ही बाबींचा तपशीलवार व सुस्पष्ट विचार केला आहे. परमार्थ व पारमार्थिक ह्यांच्यासंबंधी अनेकांच्या मनात एक प्रतिमा तयार झालेली असते. अशा अनेकांच्या अनेक प्रतिमा असल्याने गोंधळ वाढतो. खरे काय आहे ते पंचदशीसारखे ग्रंथ वाचल्याशिवाय कळत नाही. गीता, उपनिषदे, संतवाङ्मय इत्यादी ग्रंथातून व त्यांच्या टीकांमधून हे महत्त्वाचे विषय विखुरलेल्या व संदिग्ध स्थितीत असतात. त्या सर्वांचा एकत्रित विचार साधकाला फार उपयुक्त असतो.

### ७) श्रीपंचदशीची रचना -

पंचदश म्हणजे पंधरा. विवेक, दीप व आनंद अशी तीन मुख्य प्रकरणे असून प्रत्येक प्रकरणाचे पाच भाग आहेत. असे एकूण पंधरा भाग मिळून ह्या ग्रंथाची रचना केली आहे. विवेक म्हणजे शास्त्रशुद्ध विचारपूर्वक केलेली निवड. दीप म्हणजे विशिष्ट विषयावर टाकलेला प्रकाश. आनंद हे ब्रह्माचे स्वरूप असून त्याचे प्रकार व साधने ह्या प्रकरणात सांगितली आहेत. मूळ ग्रंथात फक्त श्लोक असून अन्वय, अर्थ व टीका या टीकाकारांच्या आहेत.

### ८) श्रीपंचदशीच्या मुख्य तीन प्रकरणांचा सारांश -

#### अ) विवेक प्रकरण --

अ. १) तत्त्वविवेकः -

पासष्ट श्लोकांच्या पहिल्या 'तत्त्वविवेक' ह्या तत्त्वाचा विचार करणाऱ्या प्रकरणात दृश्य जगताचे कारण किंवा अधिष्ठान असणाऱ्या ब्रह्माचा विचार केला असून साधकाला त्याचे ज्ञान न होऊ देणाऱ्या मायेचा, अज्ञानाचा व अविद्येचा विचार सांगितला आहे. जगत्, जीव व ईश्वर हे जड-चेतन विवेकाच्या संदर्भात क्रमाने श्रेष्ठ असले तरी ते तीनही मायेच्या प्रांतातीलच आहेत कारण जीवामध्ये अविद्येचे व ईश्वरात मायेचे कल्पित मिश्रण आहे. जगत् तर अचेतन प्रकृतीचेच घडले आहे. ब्रह्म किंवा स्वरूपाच्या ज्ञानात द्वैत किंवा भेद नसतो. जागृती, स्वप्न व सुषुप्ती ह्यांच्यातील अनुभव वेगळे असले तरी अनुभवांचे ज्ञान, 'ज्ञान' ह्या स्वरूपात एकच असते. जागृती व स्वप्न ह्या अवस्थातील ज्ञान सहजपणे कळते. पण

सुषुप्तीत ज्ञान असते हे युक्तीने समजावून घ्यावे लागते. होणाऱ्या प्रत्येक ज्ञानाला संविद्‌चे अधिष्ठान असून ती एकमेव, अनादी व अनंत आहे. ही संवित् हेच आत्म्याचे स्वरूप असून त्याविषयी जीवाला सतत प्रेम व ओढ वाटते. हे प्रेम वास्तविक आत्मस्वरूपाविषयी असले तरी भ्रमाने ते विषयांचे आहे असे वाटते. हा आत्मा सत्, चित् व आनंदरूप असून तोच ब्रह्म आहे. आत्म्याचे त्याच्या ओढीच्या रूपाने सामान्य ज्ञान सर्वांना असते पण 'तो मी आहे' असे विशेषज्ञान नसते. मायेच्या शक्तीमुळे हे विशेषज्ञान होत नाही. ह्या शक्तीला अविद्या असे नाव आहे. अविद्या प्रकृतीपासून निर्माण होते. ती जीवाचे कारणशरीर आहे. जीवाला कारणशरीराबरोबरच स्थूल व सूक्ष्म शरीरेही असतात. ह्या तीनपैकी सूक्ष्म शरीरात ज्ञानेंद्रिये, अंतःकरण, कर्मेंद्रिये व प्राण ह्यांचा समावेश होतो व जन्म-मरणादी असणाऱ्या अस्थिमांसाच्या देहाला स्थूल शरीर म्हणतात. व्यष्टीरूप जीवाला जशी तीन शरीरे आहेत, तशीच ती समष्टीरूप ईश्वरालाही आहेत. जीवांना भोग मिळावा म्हणून तो ईश्वर पंचमहाभूतांचे पंचीकरण करून (योग्य प्रमाणात मिश्रण करून) स्थूल सृष्टी निर्माण करतो. सृष्टीमुळे माणूस बहिर्मुख होऊन जन्ममरणांच्या चक्रात सापडतो. माणसांतील कोणा भाग्यवानाला त्याचे पुण्य उदयाला आल्याने श्रीगुरूंचा लाभ होऊन पाच कोशांचा विवेक करण्याचे ज्ञान मिळते. त्या ज्ञानाने पंचकोश हे आत्म्याचे स्वरूप नसून आत्मा त्यांचा प्रकाशक आहे हे कळते. तीन देह व पाच कोश हे दोन्ही सारखेच आहेत. कोशांचा विवेक करून जे कळते त्याची 'तत् त्वम् असि' ह्या महावाक्याने पुष्टी होते. महावाक्याच्या विवेकात भागत्याग लक्षणा वापरून त्यातील पदांच्या लक्ष्यार्थाची संगती लावून घ्यावी लागते. अशा रीतीने महावाक्याने जे ब्रह्मज्ञान होते ते विकल्पशून्य असल्याने त्याला निर्विकल्प असेही म्हणण्याची गरज नाही. कारण 'निर्विकल्प' शब्दात सापेक्षता असून 'विकल्प' म्हणजे द्वैत असेल तरच तो वापरता येतो. महावाक्याचे श्रवण, मनन व निदिध्यासन करावे. निदिध्यासनाने समाधीचा अनुभव येतो. समाधीमुळे अनंत जन्मातील कर्मफळे भस्म होऊन 'मी ब्रह्म आहे' असा साक्षात्कार होतो.

अ. २) पंचभूतविवेकः -

दुसरे पंचभूतविवेक हे प्रकरण १०९ श्लोकांचे आहे. त्यात पाच महाभूतांच्या स्वरूपाच्या ज्ञानाच्या आधाराने सद्रूप अद्वैताचे ज्ञान होते असे सुरुवातीलाच म्हटले आहे. आकाशादी महाभूतांचे शब्दादी गुण, गुणांचा तपशील व ते गुण कळणारी त्यांची कर्णादी इंद्रिये सांगून कर्मेंद्रियांच्या कर्मांचे वर्णन केले आहे. इंद्रियांना मनाची प्रेरणा असून गुणांमुळे मनाची विषयांकडे आतून प्रवृत्ती होते व विषयांमुळे गुण जागे होऊन मनाला प्रवृत्त करतात. त्या गुणांमुळे होणारे पापादी (रज) परिणाम सांगून मन व बुद्धी इत्यादींचे सर्व व्यवहार आत्म्याच्या सत्तेवर होतात असे सांगितले आहे. शब्दादी गुण असलेले पदार्थ पांचभौतिक असून ते जाणणारी इंद्रियेही तशीच आहेत. पांचभौतिक पदार्थ अचेतन असतात.

ह्यापुढे सद्रूप चेतन तत्त्वाचे स्पष्टीकरण करण्यासाठी **'सदेव सोम्य इदं अग्र आसीत्'** हे छांदोग्यउपनिषदातील वाक्य घेतले आहे. अचेतन भौतिक पदार्थात स्वगतादी भेद सांगून ते चेतनात नसतात असे सिद्ध केले आहे. सृष्टीचा आत्म्याला वा आत्म्याचा सृष्टीला स्पर्शही होत नाही. मात्र शून्य हे आत्म्याचे स्वरूप नाही. शून्य हे मायेचेही स्वरूप नाही. सर्व निर्मिती व हालचाल शक्तीची असली तरी

शून्य तसेच शक्ती, ही दोन्ही आत्म्याहून वेगळी द्वैतरूप तत्त्वे नाहीत. मायिक विश्वाला व्यापून आत्मा अपरंपार उरला आहे. मायिक विश्व भ्रमरूप असून मायिक जीवाला ते भ्रमाने सत्य वाटते. मायिक पंचभूतांच्या व्याप्तीचे त्यांच्या उत्पत्तीच्या क्रमानुसार हळूहळू घटणारे प्रमाण सांगितले आहे. पंचभूतात चेतनाचा अंशही नसला तरी मुमुक्षूला त्यांच्या विचारातून दूर करण्यासाठी काही प्रक्रिया बसवून दिल्या आहेत. वेदान्ताव्यतिरिक्त बाकी सर्व शास्त्रकारांनी जगातील भेदाविषयी केलेल्या कल्पना त्या शास्त्रांच्या दृष्टीने सत्य असल्या तरी त्यांनी वेदान्तशास्त्राचे काही बिघडत नाही. एकदा जीव व ब्रह्म ह्यांचे ऐक्य अनुभवून जग मिथ्या आहे असा निश्चय झाल्यावर देह पडेपर्यंत तो जीव निभ्रान्त असतो. मरणसमयी झोप, बेशुद्धी इत्यादी असले तरी गेलेली भ्रान्ती गेलेलीच राहते. महाभूत विवेकाने ह्या पद्धतीने मोक्षसुख लाभते.

अ. ३) - पंचकोशविवेक -

या प्रकरणामध्ये श्लोकसंख्या ४३ असून शरीरामध्ये पाच कोश आहेत व त्यांच्या विवेकाने त्या कोशात जणू दडलेल्या ब्रह्माचे ज्ञान होते असे सांगितले आहे. ही कल्पना मुळात तैत्तिरीय उपनिषदामध्ये आहे. पाच कोश एकाच्या आत एक असल्याने त्यांची जणू एक गुहाच आहे. अन्न खाऊन प्रजननक्षम झालेल्या पुरुषापासून स्त्रीच्या ठिकाणी उत्पन्न झालेल्या अस्थिमांसाच्या शरीराला अन्नमयकोश म्हणतात. कोश म्हणजे आत्मा नाही. ह्या शरीरात व्यापून राहून त्याला कार्यक्षम करणाऱ्या प्राणाला प्राणमयकोश म्हणतात. अहं व मम म्हणणाऱ्या व कामादिकांनी त्रस्त असलेल्या मनाला मनोमयकोश म्हणून, 'मी कर्ता' म्हणणाऱ्या व चिदाभासयुक्त बुद्धीला विज्ञानमयकोश म्हटले आहे. 'मी भोक्ता' म्हणणाऱ्या सुषुप्तीला आनंदमयकोश असे नाव देऊन हे पाचही कोश अनात्म म्हणजे अचेतन आहेत असे सांगितले आहे. (पंचकोशांचा तपशील येथे सांगितलेला नाही.) 'हा कोश आहे' असे ज्याच्या ज्ञानप्रकाशात अनुभवाला येते तो आत्माच चेतन असून ते 'मी' चे खरे स्वरूप आहे. आत्मा स्वयंप्रकाश असून अनुभवरूप असल्याने त्याच्या अनुभवासाठी अन्य साधनाची गरज नाही. 'मला बोध होतो' व 'मला बोध होत नाही' ही दोन्ही बोलणी बोधरूपच आहेत. व्यवहारातील प्रत्येक ज्ञान ज्ञानेंद्रिये व अंतःकरण ह्यांच्या साहाय्याने होते. असे 'होणारे' विषयज्ञान बाजूला करून वृत्ती आत वळवावी. पंचकोशांचाही निरास करावा. तो केला असता फक्त ज्ञानरूप साक्षी उरतो. तोच आत्मा हे जाणावे. कोशांचा निरास करीत असताना विज्ञानमय कोशाच्या निरासानंतर 'काही नाही' असे वाटू शकते, हेच शून्य. हे शून्यच आत्मा आहे असे कोणी म्हणतात. पण त्या शून्याला जाणणारा तेथे विद्यमान असतो. त्यामुळे शून्याची सिद्धी होत नाही. शून्य जाणणारा साक्षी हे 'मी'चे खरे स्वरूप आहे हे ओळखावे.

आत्म्याबद्दल तो 'असा' किंवा 'तसा' ह्या पद्धतीने बोलता येत नाही. असे बोलल्यास त्रिपुटी निर्माण होते व आत्मा 'ज्ञेय' ठरतो. तेव्हा त्या सर्वांच्या पलीकडील ज्ञानेंद्रियांना अथवा सहा प्रमाणांना विषय न होणारा असा जो, तो स्वसंवेद्य आत्मा मी आहे, असा निश्चय करावा. आत्मा इंद्रियगम्य नसल्याने त्याचा कधी बाध होत नाही. मी नाही असे कधीच होत नाही कारण सत् हे माझे स्वरूप आहे. कोशांसह सर्व जगाचा बाध करणारा साक्षी कधीच बाधित होत नाही. देश, काल किंवा वस्तू ह्यांच्या

मर्यादा ब्रह्माला नाहीत. ते अनंत आहे. ब्रह्मांडासह व्यवहारातील प्रत्येक पदार्थाला ह्या तिन्ही मर्यादा असतात. उदा. घट. तो एका ठराविक जागीच राहतो. त्यापलीकडे त्याला व्यापकत्व नाही म्हणजे तो देशाने मर्यादित आहे. घटाला उत्पत्ती व नाश असल्याने तो कालाने मर्यादित आहे व जेथे दुसरा पदार्थ असतो तेथे तो नसतो म्हणून तो वस्तूने मर्यादित आहे. अशा तिन्ही मर्यादा निर्विकार, विभु व भेदरहित ब्रह्माला नसतात. म्हणून ब्रह्म सद्रूप, ज्ञानरूप व अनंत असते. असे असले तरी शास्त्राने मायेच्या उपाधीची ब्रह्मावर कल्पना करून त्याला ईश्वरत्व दिले व तो नियंता झाला. त्याची शक्ती सर्व विश्वात व्यापून राहून विश्वाचे नियंत्रण करते. अविद्येच्या पंचकोशात्मक उपाधीमुळे ब्रह्माला जीवत्व प्राप्त झाले. या दोन्ही उपाधी विचाराने दूर केल्या असता, 'त्यांचे जो प्रकाशन करतो तो मी आहे' असा 'स्वसंवेद्य अनुभव' येतो. असा अनुभव घेणारा जीव वासनारहित होऊन स्वतः ब्रह्मच होतो, जन्ममरणांच्या चक्रातून सुटतो.

अ. ४) द्वैतविवेकः -

एकोणसत्तर श्लोकांचे द्वैतविवेक हे प्रकरण जीवाने ज्या द्वैतबुद्धीचा त्याग करावयाचा तो त्याग करता यावा यासाठी सांगितले आहे. ईश्वर व जीव ह्या दोघांनी आपापल्या द्वैताचा पसारा मांडला आहे. ईश्वराने द्वैतरूप जग निर्माण केल्यावर त्यात प्रवेश केला. ईश्वर व जीव हे ब्रह्मच असूनही जीवाला हे ज्ञान नसल्याने तो सुखदुःखांचे द्वंद्वमय जीवन जगतो. दृश्य जगत् ईश्वराची निर्मिती असून जीव त्याचा भोक्ता आहे. प्रिय, अप्रिय व उपेक्ष्य असे तीन प्रकारचे हे जग आहे. भोक्त्याचा स्वभाव, रुची आणि रूढीनुसार, वेगवेगळ्या व्यक्ती व पदार्थांविषयी वेगवेगळ्या कल्पना करून तो त्यांचा तसा भोग घेतो. उदा. एकच स्त्री आई, पत्नी, बहीण, भावजय इत्यादी असते. तिचे मूल, पती, भाऊ, दीर इत्यादी तिच्याकडे वेगळ्या वेगळ्या दृष्टीने पाहतात. भ्रम, स्वप्न, मनोराज्य, स्मरण व जागृती ह्या सर्व स्थितीत अंतःकरणवृत्ती त्या त्या पदार्थाचा आकार घेते व त्यामुळे त्या त्या पदार्थाचे ज्ञान होते. म्हणून सृष्टी मनोमय आहे. म्हणून घटासारखे पदार्थ, एक मातीमय व एक बुद्धिमय असे दोन प्रकारचे असतात. त्यांतील बुद्धिमय पदार्थ जीवाला बद्ध करतात. ध्यानाभ्यासाने ध्यानापुरते मनोमय पदार्थ निवृत्त होत असले तरी सततच्या विवेकाशिवाय त्यांचा बाध होत नाही. विवेकाची सर्व सामग्री मनोमय व द्वैतरूप असली तरी त्याला शास्त्रीय द्वैत म्हणतात. विवेकाने ब्रह्मज्ञान झाल्यावर तो विवेकही निवृत्त होतो. म्हणून अनात्मविचार विवेकाने टाकून आत्मविचारात राहावे. अशास्त्रीय द्वैत तर आधीपासूनच सोडावे लागते. अनात्म वस्तू हेच अशास्त्रीय द्वैत असून त्याचे मनोराज्य व कामक्रोधादी असे प्रकार आहेत. ते मंद व तीव्र अशा दोन स्तरात आहेत. 'मंद'चे दुःख बेताचे असून 'तीव्र'चे फार तीव्र असते. ह्या दोन्हींचे निवारण केल्यानंतर शास्त्रीय द्वैताने जीवन्मुक्ती मिळते. मुक्तीनंतरही त्या मुक्ताने विधीचे पालन करावे. प्रारब्ध फार बलवान असल्यास भोगाच्या अपेक्षेने चित्त विक्षिप्त झाले तरी शमादी अभ्यासाने ते लवकरच शांत होते. विक्षेपरहित ज्ञाता ब्रह्मज्ञ नव्हे तर ब्रह्मरूपच होतो.

अ. ५) महावाक्यविवेक --

केवळ आठ श्लोकांच्या ह्या विवेकात चार महावाक्यांचा विवेक सांगितला आहे. 'प्रज्ञानं ब्रह्म' हे पहिले महावाक्य असून प्रज्ञानरूप आत्म्यामुळे जीवाला पाच ज्ञानेंद्रियांमार्फत ज्ञान होते. तेच साक्षीचैतन्य

होय. त्यालाच 'प्रज्ञान' असे म्हणतात. अंतःकरणातील चैतन्याच्या आभासाला (बुद्धिस्थ चिदाभासाला) बुद्धीच्या व ज्ञानेंद्रियांच्या साहाय्याने ज्ञान होते. चिदाभासाचा नाश झाला तरी आत्म्याचा नाश होत नाही. सर्वत्र व्यापून असलेल्या चैतन्याला ब्रह्म म्हणतात. प्रज्ञान व ब्रह्म एकच आहेत.

'अहं ब्रह्मास्मि' हे दुसरे महावाक्य आहे. व्यवहारात देह, इंद्रिये, अहंकार इत्यादींच्या संदर्भात 'अहं' हा शब्द वापरतात. परमार्थातील अहं वेगळा आहे. साधनचतुष्टयसंपन्न व गुरुकृपांकित साधक जेव्हा मननचिंतनशील होतो तेव्हा त्याला सूक्ष्मशरीराला प्रकाशित करणारे साक्षी चैतन्य जाणवू लागते. तेच पारमार्थिक 'अहं' होय. ब्रह्म म्हणजे निरुपाधिक अखंड चैतन्य. 'अहं' ला सूक्ष्मशरीराची व त्याच्या प्रकाशनाची उपाधी आहे. ब्रह्माला ती नाही. म्हणून अहंला ब्रह्मात लीन केले की ब्रह्मरूपता येते.

'तत्त्वमसि' (तत् त्वम् असि) म्हणजे 'ते तू आहेस' हे तिसरे महावाक्य आहे. सृष्टी निर्माण होण्यापूर्वी नामरूपरहित, अखंड, भेदशून्य, अद्वैतरूप असलेले ब्रह्म सृष्टी निर्माण झाल्यावरही जसे असते तसेच असते. त्यालाच शास्त्रात 'तत्' म्हणतात. साधनचतुष्टयसंपन्न व गुरुकृपाप्राप्त शिष्याला स्थूल-सूक्ष्मादी शरीरांहून अलिप्त असा जो साक्षी जाणवतो तोच 'तू' ह्या पदाने सांगितला जातो. हा 'तू' 'तो' आहेस असे 'असि' पदाने सांगावयाचे आहे.

'अयं आत्मा ब्रह्म' हे चवथे महावाक्य आहे. अयं म्हणजे हा. 'हा आत्मा' ह्या शब्दप्रयोगाने अहंकारादी देहाचा साक्षी, प्रकाशक व अधिष्ठान असलेला 'प्रत्यक्षेण प्रमाणेन अवगम्यते यत् तत्' असा प्रत्यक्षावगम (गीता ९-२) असलेला आत्मा सांगितला जातो. 'ब्रह्म' म्हणजे दृश्य जगाचे सार किंवा तत्त्व. हा आत्माच ते तत्त्व आहे.

**ब) दीप प्रकरण ---**

ब. १) चित्रदीप --

अध्यारोप व अपवाद ही प्रक्रिया स्वीकारून परमार्थशास्त्रात आत्मबोध केला जातो (पहा - ग्रंथप्रवेश). पांढऱ्या कापडावर चित्र रंगवताना केलेल्या चार प्रक्रिया हा या प्रकरणातील दृष्टान्त आहे. १) स्वच्छ धुणे, २) खळ भरणे, ३) चित्राची बाह्य आकृती आखणे, ४) रंगवणे. या प्रक्रियेतील क्रमाचा दृष्टान्त हा भासणाऱ्या जगाच्या उत्पत्तीचा दार्ष्टान्त समजाविण्यासाठी वापरला आहे. जसे -

१) माया व तिचे कार्य जेथे नाही असे शुद्ध ब्रह्म - वस्त्र.
२) मायेने ते जणू भरून गेलेले अन्तर्यामी - खळ भरून गुळगुळीत केलेले वस्त्र.
३) अपंचीकृत भूतकार्यांच्या समष्टी सूक्ष्म शरीरातील सूत्रात्मा - चित्राची बाह्य आकृती.
४) पंचीकृत भूतकार्याची स्थूल शरीरे घेऊन झालेले विराट - रंग भरणे.

हा दृष्टान्त व दार्ष्टान्त ह्यांच्याविषयी बराच उहापोह या प्रकरणात केला आहे. रंग जसे कापडाचे आहेत असे वाटते तसे अज्ञानी जनांना संसार आत्मस्वरूपात आहे असा भ्रम होतो. चित्रात पाणी असले की तेथील वस्त्र दिसत नाही त्याप्रमाणे नामरूपात्मक संसारामुळे ब्रह्म दिसत नाही. हा अविद्येचा परिणाम आहे. ही अविद्या वेदान्तरूप विद्येने नष्ट होते. ह्या विचाराने जगत् व जीवाचा बाध करून उरलेल्या

आत्म्याच्या अनुसंधानात राहावे. शब्दाने कळणारी विद्या परोक्ष असून अनुभवाच्या विद्येला अपरोक्ष म्हणतात. जीव व ब्रह्म ह्यांचे ऐक्य समजण्यासाठी महाकाश, मठाकाशादी प्रक्रिया बसवून त्यानुसार जीव कूटस्थादी समजावून घ्यावेत. आकाशाची उपाधी बदलली तरी आकाश तेच, तसेच व तेवढेच असते त्याप्रमाणे ब्रह्माची उपाधी बदलली तरी ब्रह्म तेच, तसेच व तितकेच असते. कूटस्थ चैतन्य नित्यप्रकाशमान असले तरी अविद्येमुळे ते जाणवत नाही. विवेकाने अविद्या निवृत्त झाली की आत्मभान होते. मल, विक्षेप व आवरण ह्या अविद्येच्या तीन शक्ती असून त्या, त्या त्या साधनाने निवृत्त होतात. २९० श्लोकांच्या ह्या 'दीपात' अनेक विषयांवर प्रकाश टाकला असून ते विषय एकातून एक असे निघत गेले आहेत. उदा. -

१) जड व चेतन पदार्थात ब्रह्म असते.
२) जीव व कूटस्थ ह्यांच्यातील भेद न कळण्याचे कारण - भेदभ्रांती.
३) भेदाचा भ्रम होण्याचे कारण - विक्षेप.
४) विक्षेपाचे कारण प्रारब्ध.
५) आत्मा व त्याचा देह, मन, बुद्धी, प्राण, इंद्रिये इत्यादींशी संबंध.
६) ह्यात प्राण श्रेष्ठ असला तरी प्राणाचा प्राण असलेल्या आत्म्याचे सर्वश्रेष्ठत्व.
७) मन व बुद्धी ह्यांचे नाते.
८) बौद्ध, शून्य, चार्वाक, मीमांसक ह्यांच्या मतांचे खंडन.
९) ईश्वर ह्या तत्त्वाविषयी अनेकांच्या अनेक कल्पना.
१०) पौराणिक शंकरादी देवांचे श्रेष्ठ-कनिष्ठत्व.
११) श्रुतीनुसार ईश्वर तत्त्वाचा निर्णय केला नाही तर इतर सर्व निर्णय सदोष असतात.
१२) मायाविशिष्ट साभास चेतन म्हणजे ईश्वर.
१३) माया श्रुतीनुसार, युक्तीनुसार व सामान्यांच्या मतानुसार तीन प्रकारची. ती अनुक्रमे तुच्छ, अनिर्वचनीय व सत्य आहे, ह्याचे स्पष्टीकरण.
१४) माया परिणामतः दुर्घट असून तिच्या स्वरूपाचा अंदाज लागणे शक्य नाही.
१५) दिसणारे जग मायिक, मायाकार्य व मायामय आहे.
१६) प्राण्यांचे बीज, त्यापासून गर्भधारणा, त्यापासून जीवाचा जन्म, जीवन व मरण हे सर्व अतर्क्य आहे.
१७) अव्यक्त नावाच्या तत्त्वात दृश्य जगत् बीजरूपाने असते. ईश्वर त्या जगतात राहून त्याचे नियमन करतो.
१८) अद्वैत वेदान्तात वरील विचार केवळ अध्यारोपापुरता स्वीकारलेला आहे.
१९) सृष्टीची उत्पत्ती क्रमाने झाली की एकदम झाली ह्या विचाराला मायावादात स्थान नाही.
२०) ईश्वराची उपासना ज्या भावाने करावी तो भावच तिचे फळ देतो. हे फळही श्रेष्ठ वा कनिष्ठ असले तरी ते मिथ्याच असते.
२१) त्वं व तत् हे भिन्न आहेत असे ज्यांना वाटते त्यांच्यासाठी त्याच्या निरासाची कल्पना सांगितली

आहे.

२२) 'आत्मा असंग आहे' असे केवळ शब्दाने कळून भागत नाही. देह व जग दिसते तोपर्यंत संगभावना सुटणार नाही.

२३) अद्वैतमतानुसार बंधन, उपदेश, साधन व मोक्ष ह्या सर्व कल्पनाच आहेत.

२४) तत्त्वज्ञान झालेले ज्ञानीही प्रपंचात देहाने वावरतात. कल्पित प्रारब्धामुळे त्यांचा कल्पित देह कल्पित संसार करतो.

२५) जीवन्मुक्तस्थितीतही अद्वैताच्या अनुभवाबरोबरच द्वैताचे भानही असते. द्वैत न दिसणे हे मोक्षाचे स्वरूप नाही. द्वैत दिसूनही ते बाधित असणे हाच मोक्ष.

२६) अनंत जन्मांच्या अविद्येच्या संस्कारातून स्वतःची सोडवण करण्यासाठी आत्मानात्मविचारही अखंड करावा लागतो.

२७) जीवन्मुक्तस्थितीतही इच्छा, आशादी असू शकतात. पण त्या सर्वांच्यापासून अखंड असंगत्वाचा अनुभवही असतो.

२८) सुखावर प्रेम व दुःखाचा द्वेष त्याच्याजवळ नसतो. त्याला सुख-दुःखांचा अनुभवच येत नाही असे नाही.

२९) ज्ञानी पुरुष पाषाणासारखा पडून राहत नाही. इतर माणसे करतात ते सर्व व्यवहार तो करताना दिसणे शक्य आहे.

३०) वैराग्य, शांती, अडथळा नसलेले ज्ञान इत्यादींनी मोक्ष मिळतो. केवळ तपश्चर्येने पुण्यलोक मिळतो.

ब. २) तृप्तिदीप --

२९८ श्लोकांचे हे मोठे प्रकरण आहे. परमार्थ व पारमार्थिक ह्यांच्यासंबंधी असलेले अनेक गैरसमज ह्यात दूर केले आहेत. 'मी ब्रह्म आहे असा अनुभव घेतलेला काय इच्छा धरून, कोणाच्या इच्छेसाठी शरीराच्या मागे जाऊन त्याचे छळ स्वतःवर ओढवून घेईल?' अशी सुरुवात केली आहे. ह्यात जीवन्मुक्ताच्या तृप्तीवर दिव्याचा प्रकाश टाकला आहे. अष्टधा प्रकृतीच्या शरीरात जीव राहतो. तो 'मी देह' ह्या भ्रमाने तीनही शरीरांची दुःखे 'मी' म्हणजे आत्म्यावर अज्ञानामुळे ओढवून घेतो. दुःखाची कारणे देहात व जगात असतात. देहात जीव व जगात ईश्वर ही आभासरूप चेतन तत्त्वे मायेमुळे प्रविष्ट झाली आहेत. ब्रह्माच्या अधिष्ठानावर माया हे अघटित उपद्व्याप करते व जीवाला 'अहं' असे म्हणावयास लावते. मूर्ख - शरीराला, तत्त्ववेत्ता - आभास व कूटस्थाला व ज्ञानी - चिदाभास व कूटस्थाला वेगळा करून 'मी' असे म्हणतो. एकाच आत्म्याविषयी असे वेगळे ज्ञान कसे होते ह्याचे उत्तर तेविसाव्या श्लोकापासून अठ्ठाविसाव्या श्लोकापर्यंत 'तू दहावा आहेस' ह्या प्रयोगासह असलेल्या विचाराने दिले आहे. 'अयं अस्मि' ह्या विचाराधीन श्रुतीचे हे भाष्य आहे (बृह. ४-४-१२). 'तूच दहावा' असे त्रयस्थाने सांगितल्यावर 'मीच दहावा' असे 'अयं' म्हणजे 'हा' ह्या प्रकारचे प्रत्यक्ष ज्ञान होते. त्याप्रमाणे 'तू ब्रह्म' असे श्रीगुरूंनी सांगितल्यावर 'मी ब्रह्म' असे ज्ञान होते. आत्मज्ञान आत्म्याला वा बुद्धीला होत नसून ते

बुद्धिस्थ चिदाभासाला (जीवाला) होते व ते सात अवस्थातून क्रमाक्रमाने होते. या क्रमात अज्ञानापासून अखंड तृप्तीपर्यंतच्या अवस्थांचे वर्णन केले आहे. 'मी दहावा' ह्याप्रमाणे 'मी ब्रह्म' असे ज्ञान झाल्यावर ते कधीच नष्ट होत नसल्याने व ब्रह्म तृप्तिरूप असल्याने सहजच सतत तृप्ती असते. हाच ह्या प्रकरणाचा मुख्य विषय आहे. ब्रह्मज्ञानाचे परोक्ष व अपरोक्ष असे दोन प्रकार असून 'ब्रह्म नाही' हे अज्ञान परोक्षज्ञानाने व 'ब्रह्मानुभव नाही' हे अज्ञान अपरोक्षज्ञानाने जाते. हे ब्रह्म सत्य, ज्ञान व अनंतरूप असून ते जणू पाच कोशात दडले आहे. त्याचे ज्ञान होताच सर्व शास्त्रीय द्वैतात्मक साधनेही गळून पडतात. पण ते ज्ञान होईपर्यंत शमादिकांसह श्रवण नेटाने चालू ठेवावे. म्हणजे त्याचेच चिंतन, त्याचेच वर्णन, एकमेकांना त्याचाच उपदेश करण्याचा ब्रह्माभ्यास करावा. असेच सगुणाच्या संदर्भातही सांगितले आहे. त्याला हरिकथेची जोड दिल्यास बुद्धीलाही विरंगुळा मिळतो. सामान्य काव्यशास्त्रविनोदात बुद्धी तत्त्वापासून ढळते. हरिकथा, भगवद्‌भजन इत्यादींनी असे न होता उलट अनेक प्रकारांनी ती स्वरूपाशी संलग्न राहते. जनकासारखे ज्ञानी सम्राट राज्य चालवूनही स्वरूपाच्या अनुसंधानात राहिले. प्रारब्ध हे ज्ञान्याकडूनही नियोजित कर्म करूनच घेते. पण ज्ञान्याने अंतःकरणाचा व जगताचा बाध केला असल्याने प्रारब्धाने त्याच्याकडून करवून घेतलेली कर्मे त्याला लिप्त करीत नाहीत. त्याला सुख-दुःखे किंवा अपराधीपणाची भावनाही होत नाही. स्वेच्छा, अनिच्छा व परेच्छा अशा तीन प्रकारचे प्रारब्धकर्म आहे. त्यानुसार ज्ञान्यांचे वर्तन होऊन ते जगदुद्धाराचे कार्य करू शकतात. पण त्यात फळाच्या इच्छेचा मागमूसही नसतो. ही स्थिती येण्यासाठी मुमुक्षूने अखंड आत्मानात्मविचार करावा. तीनही शरीरांच्या दुःखांचे साक्षित्व करावे. चिदाभास शरीराच्या साहाय्याने सर्व जीवन जगतो. शरीराचा आत्म्याशी जराही संबंध नाही हा विचार सतत सांभाळावा. त्यामुळे ज्ञान झाल्यावर तो ज्ञानी जसा प्रसंग असेल तसे जीवन जगून इतरांना मार्गदर्शन होईल असे वागतो. त्याची तृप्ती कशानेही जरासुद्धा ढळत नाही.

ब. ३) कूटस्थदीप --

'कूटस्थ चैतन्य' हा शब्द अध्यात्मशास्त्रात सतत वापरला जातो. त्यावर येथे ज्ञानरूप दिव्याचा प्रकाश टाकला आहे. चिदाभास म्हणजे काय हेही सांगितले आहे. ज्ञानरूप कूटस्थचैतन्य संपूर्ण शरीरात सामान्यत्वाने व्यापून राहते. चिदाभास बुद्धीमध्ये विशेषत्वाने जाणीवरूपाने राहतो. बुद्धीतील चिदाभासाचे काही जाणणे व न जाणणे सामान्य ज्ञानरूप कूटस्थाच्या सत्तेवर होते. केवळ बुद्धी अचेतन असून चिदाभासामुळे ती क्रियाशील (Activate) होते. सर्व प्रकारच्या विशेषांसह विषयांचे होणारे ज्ञान चिदाभासाला होते व त्या ज्ञानाला शास्त्रात 'फल' असे म्हणतात. हा चिदाभास घटादी बाहेरचे व क्रोधादी आतील पदार्थ जाणतो. चिदाभास जागृतादी कोणत्याही अवस्थेत असला तरी कूटस्थाला एकही अवस्था नसून तो त्या सर्वात सामान्यज्ञानरूपाने असतो. बुद्धितत्त्व अग्नी या महाभूतापासून व सत्त्व या गुणापासून झाले असल्याने ते अति स्वच्छ आहे. त्यामुळे त्यात कूटस्थचैतन्याचा आभास व्यक्त होतो. ह्यालाच चिदाभास म्हणतात. कूटस्थ व बुद्धी देहभर व्यापून असल्याने चिदाभासरूप जीवही शरीर व्यापून राहतो. ह्या चिदाभासाला 'मी कूटस्थ आहे' असे बाधसामानाधिकरण्याने ज्ञान होते. कूटस्थ व ब्रह्म ह्यांत मुख्यसमानाधिकरण आहे. उदा. - दोरीवरील सर्पाचा बाध करून दोरीचे ज्ञान - बाधसामान्याधिकरण्य व

घटाकाश व महाकाश - मुख्यसामानाधिकरण्य आहे. बुद्धी, कूटस्थ, जग, ब्रह्म इत्यादींचे विवेचन करणे आत्मज्ञानासाठी अनिवार्य आहे. पुराणे, स्मृती व श्रुती ह्यात कूटस्थाचे वर्णन प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे केले आहे. श्रद्धावंताने ते प्रमाण मानून आपले कल्याण करून घ्यावे. वेळ व श्रम फुकट घालविणारे वाद करून मिळालेल्या मानवी बुद्धीचा नाश करू नये. कूटस्थ असंग असून त्याला जन्मजरादिकांचा स्पर्श नाही. खऱ्या परमार्थात उत्पत्ती, नाश, बद्धता, साधना, मोक्ष इत्यादी काहीच नाही. कूटस्थ व ब्रह्माचे अज्ञान असेपर्यंतच ह्या सर्व बाबी शास्त्राने तात्पुरत्या स्वीकारल्या आहेत. श्रुतीतील वाक्यांचे तात्पर्य विवेकाने समजावून घेऊन, त्यांच्यातील भासणाऱ्या विरोधाचा परिहार करून साधकाने 'मी कूटस्थ आहे' व 'कूटस्थ ब्रह्म आहे' असा अनुभव घ्यावा.

ब. ४) ध्यानदीप --

एकशे अठ्ठावन्न श्लोकांच्या ह्या प्रकरणात 'ध्यान' ह्या सर्वांना कुतूहल असणाऱ्या विषयावर विचार केला आहे. ज्यांना सतत ब्रह्मचिंतन करणे शक्य नसते त्यांनी उपासनारूप ध्यान करावे. उपासनेसाठी स्वीकारलेले आलंबनही वेदान्तदृष्ट्या भ्रमरूप असले तरी तो संवादी म्हणजे अनुकूल भ्रम आहे. उदा. भगवान विष्णू, देवी इत्यादी मूर्ती. उपासनाशास्त्राने आलंबने स्वीकारली असल्याने ती शास्त्रीय आहेत. अशा उपासनेने आलंबनाचे अपरोक्ष व आत्म्याचे परोक्षज्ञान होते. कारण उपास्य मूर्तीवर ब्रह्माची भावना केलेली असते. श्रद्धा हीच येथे मुख्य काम करते. आत्म्याचे अपरोक्षज्ञान होण्यासाठी श्रुतिवाक्यांवर श्रद्धा ठेवून सातत्याने आत्मानात्मविचार करावा. त्याने एका किंवा एकाहून अधिक जन्मात अपरोक्षज्ञान निश्चितपणे होते. भूत, वर्तमान व भावी प्रतिबंध म्हणजे अडथळे असतील व या एका जन्मात ज्ञान झाले नाही तरी पुढील जन्मात ते होते. गीतेमध्ये योगभ्रष्टाविषयी असेच सांगितले आहे. आलंबन हे ज्ञेय म्हणजे जाणण्यासारखे असल्याने ते उपास्य म्हणजे उपासना करण्यासारखे आहे. पण आत्मा मात्र वेद्य नसल्याने उपास्य नाही. तरी श्रुतीने प्रणवाच्या रूपाने निर्गुण उपासना सांगितली आहे. पण हे मोक्षाचे साक्षात् साधन नाही. आत्मानात्मविचार हे साक्षात् साधन आहे. अनधिकारी व अविचारी माणसे कोणत्याही उपासना करीत असली तरी शास्त्रात फरक पडत नाही. उपासना उपासकाच्या म्हणजे कर्त्याच्या मर्जीप्रमाणे किंवा समजुतीप्रमाणे होते. बोध किंवा ज्ञान मात्र वस्तुतंत्र म्हणजे जसे ज्ञेय असते तसेच असते. असे ज्ञान झाल्यावर ज्ञात्याचे शरीर जगात काहीही करीत असले तरी त्याच्या चित्ताने सतत ध्येयाला म्हणजे ध्यानाच्या विषयाला धरून ठेवलेले असते. ह्यालाच 'चालते-बोलते ध्यान' म्हणतात. एकदा ध्येय म्हणजे आत्मा व ध्याता म्हणजे मी आहे असा दृढ निश्चय झाला की जीवन चालायचे तसे चालले तरी या निश्चयात फरक पडत नाही. बुद्धीच्या इतर व्यवहारात जरी तो हे विसरतो व तसे विसरला, तरीही त्याच्या निश्चयात उणीव येत नाही. देह व दृश्य जगाचा विसर पडणे हा ध्यानाचा परिणाम असून तो ज्ञानाचा परिणाम नाही. ज्ञानस्थितीत अंतःकरणाची प्रारब्धानुसार दृश्य जगताकडे प्रवृत्ती होऊ शकते. ती विधीप्रमाणेच असली पाहिजे असा नियम नाही. ह्या सर्व प्रवृत्ती कल्पित आहेत असा त्याचा सहजनिश्चय असतो. तो कर्तव्य करील किंवा न करील, ध्यानाभ्यास करील किंवा न करील. शास्त्र त्याच्यावर बंधन घालत नाही. त्याच्याजवळ कोणाला शाप देण्याचे किंवा काही वर देण्याचे सामर्थ्य असावे असेही नाही.

हे सामर्थ्य तपश्चर्येने येते. ते ज्ञानाने येत नाही. सामान्य लोकांना सामर्थ्य असलेला त्यांच्या मतलबासाठी पूजनीय वाटतो. ज्ञानी असून सामर्थ्य नसेल तर ते त्याच्याकडे ढुंकूनही पाहत नाहीत. ध्यानाहून ज्ञान श्रेष्ठ असले तरी अधिकारानुसार त्या त्या साधकासाठी त्याचे त्याचे साधनच श्रेष्ठ असते. पामराचे जीवन जगण्यापेक्षा कर्मकांड चांगले, त्याहून सगुणोपासना व त्याहून निर्गुणोपासना श्रेष्ठ आहे. ह्यातील निर्गुण उपासना ब्रह्मज्ञानाला जवळची आहे कारण तिचे हळूहळू सविकल्प समाधीत व नंतर निरोध ह्या नावाच्या निर्विकल्प समाधीत रूपांतर होते. ह्या समाधीत देहातील सर्व अनात्म तत्त्वे दूर सरून केवळ असंग आत्मा उरतो. त्यावर चित्त स्थिर केल्यावर ब्रह्मज्ञान होते. मल व विक्षेप गेलेले असून केवळ मोहरूप आवरण शिल्लक असलेला ह्या ज्ञानाचा अधिकारी आहे. असा अधिकार नसलेल्यानेही ध्यानाने अधिकारसंपन्न व्हावे.

ब. ५) नाटकदीप --

२६ श्लोकांच्या ह्या प्रकरणात नाट्यमंदिराचा दृष्टान्त घेऊन त्यातील नर्तिका, वाद्यवृंद, प्रेक्षक इत्यादींवर रूपके बसविली आहेत. ग्रंथप्रवेश प्रकरणात व अन्यत्र केलेला अध्यारोप व अपवादांचा विचार येथे सुरुवातीला केला आहे. 'परमात्म्याने सृष्टी निर्माण केली' हा अध्यारोप असून 'फक्त ब्रह्मच आहे' हा अपवाद आहे. ह्या अनुभवासाठी साधने करावी लागतात. त्याने बंधनातून मुक्ती मिळते. एकमेव आत्मरूपात भेद पाहणे व आनंदरूप आत्म्यात दुःखाचा अनुभव घेणे हेच बंधन आहे. 'हा आत्मा मी आहे' ह्या अनुभवाला मोक्ष म्हणतात. हा सिद्ध होण्यासाठी कर्म, उपासना व आत्मानात्मविचार ही साधने करावी लागतात. आत्मविचार असे सांगतो की उंबरठ्यावर ठेवलेला दिवा घरात व घराबाहेर प्रकाश देतो त्याप्रमाणे आत्मा देहातील मनादी व जगातील घटादी पदार्थांचे प्रकाशन करतो. त्यांच्या व्यापारांचा आत्म्यावर कोणताच परिणाम होत नाही. नाट्यमंदिरात मोठ्या प्रकाशाची सोय असते. ज्याप्रमाणे त्या प्रकाशात नाटकाचा सूत्रधार, नर्तिका, वाद्यवृंद, प्रेक्षक इत्यादी सर्व प्रकाशित होतात, त्याप्रमाणे अहंकार, विषय, बुद्धी, ज्ञानेंद्रिये इत्यादी सर्व आत्मप्रकाशात प्रकाशित होतात, म्हणजे त्यांचे ज्ञान होते. हा आत्मा स्वयंप्रकाश असून त्याच्या प्रकाशनासाठी दुसऱ्या प्रकाशकाची गरज नाही. म्हणजे ज्ञानेंद्रियांनी किंवा मनाने त्याचे ज्ञान होत नाही. गुरुमुखाने वेदान्तश्रवण करून हे नीट समजून घ्यावे.

**क) आनंद प्रकरण --**

ह्या प्रकरणात आनंदरूप ब्रह्मस्वरूपाचे तत्त्वज्ञान सांगितले असून पाच अध्यायात पाच आनंदांची मीमांसा केली आहे. आनंद एकच असला तरी जीवाच्या समजुतीप्रमाणे पाच भाग केले आहेत. भूलोकावरील अपार दुःखे व परलोकातील नरकादिकांचा विचार केला असता दोन्हीकडे अनर्थच दिसतो. ब्रह्मानंदाच्या अनुभवाशिवाय तो चुकत नाही. भेददृष्टी व आत्मविस्मृती ही भयादी दुःखांची कारणे आहेत. 'आत्माच आनंदरूप आहे' हे कित्येक श्रुतीत सांगितले आहे. पहिल्या तीन अध्यायात ब्रह्मानंदच सांगितला असून शेवटच्या दोन्हीमध्ये विषयानंदाचे वर्णन आहे.

क. १) ब्रह्मानंदे योगानन्दः -

दिसणारी भूते मैथुनादी आनंदातून निर्माण होतात, विषयानंदाने जगतात व आनंदरूपातच (तत्त्वतः) लय पावतात. आत्मज्ञान नसले तर चौदा विद्या व चौसष्ट कलाही दुःखदायक होतात. खरे तर द्वैतात जसे सुख नाही तसे अद्वैतातही नाही. पण ह्याचा निर्णय असा की अद्वैतात सुख नाही तर अद्वैत हेच सुख आहे! हे अनुभवानेच सांगता येते, दृष्टान्ताने पटवता येत नाही. गाढ झोपेला जाणणारी इंद्रिये नसतात व तिला उदाहरणही नसले तरी ती झोप अनुभवानेच कळते तसेच हे जाणावे. जीवाने सुखरूप आत्मस्वरूपात स्वतःला विलीन करणे हे एकमेव श्रमरहित सुखाचे साधन आहे. विषयसुखात श्रम आहेत. जरी अजाण बालके, सार्वभौम राजा व निद्रिस्त हे सुखात दिसतात तरी त्यांनाही त्यांची त्यांची दुःखे असतातच. गाढ झोपेत बुद्धी लय पावते व तिच्यातील चिदाभास कूटस्थात विलीन होतो. असे झाल्यावर त्या अवस्थेला आनंदमय म्हणतात. जागृतीत चिदाभास बुद्धीत पुन्हा व्यक्त होऊन त्या अवस्थेतील सुखे स्पष्टपणे भोगतो. प्रारब्धामुळे त्याला जागृतीत यावेच लागते. त्यामुळे द्वंद्वमय जीवन सुरू होऊन सुख विसरले जाते. ब्रह्मानंद हा एक आनंद आहे असे केवळ बुद्धीला कळून त्याचा अनुभव येत नाही. त्यासाठी श्रीगुरुकृपापूर्वक शब्दज्ञानाकडून अर्थज्ञानाकडे व अर्थज्ञानाकडून साधनापूर्वक अनुभवाकडे वाटचाल करावी लागते. असे केले नाही तर देहतादात्म्यामुळे सुख, दुःख व उदासीनता ह्या अनुभवात जीवन संपून जाते. म्हणून सततच्या अभ्यासाने अहंकार क्षीण करून सूक्ष्म चिंतन झाल्यावर निजानंद होतो हे स्पष्ट अनुमान होते. स्वभावाने अस्थिर असलेल्या मनाला विषयांपासून आवरून, जगन्मिथ्यात्व त्याच्यावर बिंबवून, वैराग्याच्या साहाय्याने ते आत्मस्वरूपात लीन करण्याचा अभ्यास करावा. ह्याने जो समाधीसुखाचा अनुभव येतो त्या सुखाला जगात तोड नाही. असे झालेच पाहिजे असे ज्याला जणू व्यसन लागते तो ते सुख मिळवतोच. नंतर प्रारब्धाने दुःखाचे निमित्त समोर आले तरी तो उद्विग्न होत नाही.

क.२) ब्रह्मानंदे आत्मानंदः -

नव्वद श्लोकांच्या ह्या अध्यायात साधनचतुष्टयसंपन्नतारूपी अधिकार कमी असलेल्या मुमुक्षूला ब्रह्मानंद कसा मिळेल त्याचे तत्त्वज्ञान सांगितले आहे. जो अधिकाराने कमी असून केवळ बहिर्मुख लौकिक जीवन जगणारा आहे त्याला कर्म किंवा उपासना सांगावी. पण जो अधिकाराने कमी म्हणजे मंदबुद्धीचा असून जिज्ञासू आहे त्याला आत्मानंद सांगावा. असा बोध याज्ञवल्क्याने त्याच्या पत्नीला केला होता. आत्मा हाच अत्यंत प्रेमाचा विषय असून त्यासाठीच अन्य सर्व विषय प्रिय असतात हे वास्तव हा त्या तत्त्वज्ञानाचा गाभा आहे. विषयाकडील ओढ कितीही बदलती असली तरी नकळत असणारी आत्मसुखाची ओढ कायम असते. त्या सुखाचा त्याग किंवा स्वीकार करताच येत नाही कारण ते जीवाचे स्वरूपच आहे. असीम त्याग, आत्महत्या, अपार कष्ट इत्यादी सर्व नकळत आत्मसुखासाठीच असतात. 'प्रत्येकाला आपण सतत असावे' असे जे वाटते ते सद्रूप आत्म्यावरील प्रेमानेच वाटते. घराची परंपरा चालण्यासाठी पुत्र, पुष्टीसाठी अन्न, पुण्यासाठी तप इत्यादींचे प्रेम हे अंतिमतः आत्मप्रेमासाठीच असते. व्यवहारात अनुकूल व प्रतिकूल वाटणारे पदार्थ आत्मसुखासाठीच तसे वाटतात. एकदा आत्मस्वरूपाविषयी असा निश्चय झाला की पंचकोशांपासून त्याला वेगळा करण्याचा विचार सुरू होतो. मूढ दशेत असणारा पुत्रादिकांच्या प्रियत्वाचा विचार नष्ट होतो. खरे तर पुत्र हा मोठ्या दुःखपरंपरेचे कारण असतो पण तसा

अनुभव असूनही ते अविवेकामुळे मान्य होत नाही. सच्चिदानंद आत्मा बुद्धीत व्यापून असला तरी चिद्रूप जाणीव जशी व्यक्त असते तसे सुख व्यक्त होत नाही. बुद्धीत रजोगुण जास्त असला की असे होते. अष्टांग योगाने जे मिळते तेच ह्या ज्ञानयोगाने मिळते. दोघांनाही व्यवहारकाली द्वैताचे भान होतेच.

क. ३) ब्रह्मानंदे अद्वैतानंदः -

ह्या अध्यायाचे १०३ श्लोक आहेत. पूर्वी सांगितलेला योगानंद हाच आत्मानंद आहे. आत्मा एकच असल्याने त्याला अद्वैतानंदही आहे. 'आनंदापासून हे सर्व निर्माण झाले, आनंदातच ते राहते व आनंदातच विलीन होते' अशी श्रुती असल्याने हे सर्व आनंदमय आहे. आनंदरूप ब्रह्मच दृश्य जगताचे निमित्त व उपादान कारण आहे. आरंभवाद, परिणामवाद ही जगाच्या निर्मितीसंबंधीची मते दोषास्पद असून एक विवर्तवादच विचाराला टिकतो. जॉन डॉब्सन ह्या प्रसिद्ध पाश्चात्य वैज्ञानिकाने 'Apparition' म्हणजे 'अकस्मात् आश्चर्यकारक प्रगटीकरण होणे' हे दृश्य जगाचे कारण मानले आहे. अग्नी व त्याची दाहक शक्ती जशी एक आहेत तशी ब्रह्म व जगाला भासविणारी मायाशक्ती एक आहेत. त्यांच्यात अद्वैत आहे. आत्मस्वरूपावर जेव्हा किंचित 'स्व' चे व पर्यायाने 'पर'चे स्फुरण होते, ते स्फुरण हेच मनाचे स्वरूप असून त्यामुळे जग भासू लागते. हे भासणारे जग केवळ नाममात्र असून त्याला सत्यस्वरूप अशी पारमार्थिक सत्ता नाही. ज्याप्रमाणे घटामधील माती लक्षात घेतली तर घट दिसत असूनही तो मातीहून वेगळा नाही हे लक्षात येते त्याप्रमाणे दृश्य सृष्टी हा ब्रह्मावरील विवर्त आहे हे लक्षात आले की जग दिसत राहिले तरी तो विवर्त आहे हे ज्ञानी विसरत नाही. एक माती जाणली की जगातील मातीचे सर्व पदार्थ न पाहताही जाणल्यासारखे होतात त्याप्रमाणे एक ब्रह्म जाणले की सर्व सृष्टी जाणल्यासारखी होते. अध्यारोप असे सांगतो की 'मी एकटा आहे मी बहु व्हावे' असे ब्रह्माला स्फुरण झाल्यावर सृष्टी भासू लागली. विचार करताना पृथ्वीपासून शून्यापर्यंत ह्या सृष्टीचे अस्तित्व ब्रह्माच्या सत्स्वरूपावर निर्भर आहे असे लक्षात येते. ह्या शून्याचे प्रकाशन आत्मप्रकाशातच होते व तो आत्मा सुखरूप आहे. आत्मा सतत सुखरूप असला तरी मधूनच हर्ष व शोक क्षणार्धात निर्माण होतात हे खरे, पण तरी ते मानस व्यापार असून क्षणार्धातच ते लुप्तही होतात, ह्या दृष्टीने त्यांच्याकडे पाहावे. अशा रीतीने अनेक प्रकारे भासणाऱ्या द्वैताकडे दुर्लक्ष करून आत्मस्वरूपाकडे चित्त स्थिर केले असता मुमुक्षू जीवन्मुक्त होतो. द्वैताचा संस्कार अनंत जन्मांचा असल्याने अद्वैताचे सतत चिंतन करावे लागते. गाढ झोपेला जशी स्वप्न दाखविण्याची शक्ती आहे तशी ब्रह्माला सृष्टी दाखविण्याची शक्ती असल्याने ती सृष्टी दिसतच राहते. तिच्यामागे असलेल्या शक्तिमानरूप अधिष्ठानाचे चिंतन केल्यानेच ती निवृत्त होते. असे चिंतन करणारा साधक जीवनात शांत राहतो. पाण्याच्या वेगवान प्रवाहाच्या तळात असलेला खडक जसा प्रवाहाने जराही हालत नाही तशी जीवन्मुक्ताची शांती जराही ढळत नाही.

क. ४) ब्रह्मानंदे विद्यानंदः -

पासष्ट श्लोकांच्या ह्या अध्यायात विद्यानंद हा विषयानंदच असला तरी तो फक्त माणसालाच होत असल्याने तो वेगळा मानल्याचे सांगितले आहे. त्याचे चार प्रकार आहेत. १) दुःख नसणे, २) हवे ते मिळणे, ३) मी कृतकृत्य आहे असे वाटणे, ४) जे मिळवावयाचे ते मला मिळाले आहे असे समाधान

वाटणे. हे समाधान अद्वैतानंदामुळे मिळालेले असते. अद्वैतात भोक्ता व भोग्य सिद्ध होत नसल्याने कोणाला, कशासाठी आणि कशाची इच्छा होईल? अशी अद्वैतानुभूती आलेल्याला इह-पर विषयी चिंता व संचितादी कर्मांचा त्रास ह्यातील काहीच नसते. त्याच्या हातून मातेच्या वधासारखी भयानक कृत्ये घडली (परशुराम) तरी त्याची प्रसन्नता मोडत नाही. तो साधना करतांना, ग्रंथ वाचतांना, खेळतांना, हिंडताफिरतांना, कुटुंबीयांच्यात रमतांना, भोग घेतांना इत्यादी कसाही दिसला तरी त्याच्या आत्मस्थितीला जराही धक्का लागत नाही. तैत्तिरीयउपनिषदातील आनंदाची चढती कमान सांगून जीवन्मुक्त हा अवीट व निर्दोष आनंदाचा भोग घेतो असे म्हटले आहे. हा आनंदरूप झालेला महात्मा प्रारब्धानुसार व्यवहारातील विधिनिषेधात्मक जीवन जगताना दिसला तरी त्याला त्याचा कोणताच लेप लागत नाही. तो स्वतःला सर्वप्रकारे धन्य मानतो.

क. ५) ब्रह्मानंदे विषयानंदः -

ह्या अध्यायात पस्तीस श्लोक आहेत. विषयातून मिळणारे सुख हा आत्मसुखाचा आविष्कार असतो किंवा तो ब्रह्मसुखाचा अंश असतो. अंशाची भाषा समजुतीपुरती आहे. हे सुख अनुभवण्यासाठी अंतःकरणाच्या शांत, घोर व मूढ ह्या वृत्तींपैकी शांतवृत्तीची गरज आहे. चिद्रूप ब्रह्म ह्या तिन्ही वृत्तीत जाणीवरूपाने असले तरी शांतवृत्तीच स्थिर असल्याने त्यात आनंद प्रगट होतो. पाणी तापविले तर त्यात अग्नीची उष्णताच व्यक्त होते. प्रकाश व्यक्त होत नाही. तसे हे लक्षात घ्यावे. घोरवृत्ती अपेक्षा व आकांक्षांनी भरलेली असल्याने अशांत असून त्यात सुखानुभव येत नाही. मूढवृत्तीत मोह, भयादी असल्याने ती गढूळ असते म्हणून त्यातही आत्मसुख प्रगट होत नाही. सत्, चित् व आनंद हे आत्म्याचे स्वभाव सर्वत्र सारखे व्यक्त नसतात. दगडधोंड्यात फक्त सत्ता व्यक्त असते, बुद्धीत चित् व्यक्त होते, याप्रमाणे हे जाणावे. हे सर्व लक्षात घेऊन आत्मस्वरूपाच्या अनुसंधानासाठी वृत्ती घोर किंवा मूढ न ठेवता शांत ठेवण्याचा प्रयत्न सातत्याने करावा. ह्याला अनुसंधान किंवा ध्यान असे परंपरेने म्हटले तरी वास्तविक ब्रह्मज्ञान हेच शांतवृत्तीचे स्वरूप आहे. मात्र ही शांती परिपूर्ण व टिकाऊ असावी.

ग्रंथकर्त्याने शेवटी वाचकांना आशीर्वाद देऊन ग्रंथसमाप्ती केली आहे.

पंधरा प्रकरणांचा हा सारांश अर्थातच सांगितलेल्या विषयांचा केवळ अंदाज देणारा आहे. त्यात तपशील अभावानेच असून कोठे कोठे तुटकपणाही दिसतो. मूळ ग्रंथ वाचल्यानेच हे दोष नाहीसे होतील. ग्रंथातील स्पष्टीकरणात अद्वैतसिद्धांताची हानी होणार नाही अशी काळजी घेतली आहे. तत्त्वज्ञानाला संतवचनांची जोड दिली आहे. संतवचनांचा अर्थ ग्रंथविस्तारभयाने दिला नाही. ग्रंथाच्या शेवटी 'परमार्थशास्त्रातील पारिभाषिक शब्द व संकल्पनांचे अर्थ' अशी विस्तृत सूची दिली आहे. त्याचाही वाचकांना उपयोग होईल अशी आशा आहे. ह्या सर्वात कोठे त्रुटी आढळल्यास त्या जरूर कळवाव्यात ही प्रार्थना.

श्री. द. देशमुख.

***